जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.११/१०/२०२४
## दि.१०/१०/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ९५८/२०२४,भा.न्या.सं.कलम १०३(१)३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३२ वर्षे रा.पेरणे फाटा पेरणेगांव,पुणे. |
| **आरोपीत** | सुमित्रा लालसिंग ठाकुर वय ५५ वर्षे लोणीकंद पुणे (अटक)एक इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०२४ रोजी रात्रौ ००/३० वा.गट नंबर ५९३ मोकळ्या जागेत,खडी मशीन खदानी जवळ तळेराण वस्ती लोणीकंद,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादीची नमुद आई व एक इसम यांचेमध्ये असलेल्या संबंधाच्या कारणावरुन नमुद फिर्यादीचा भाऊ व आई यांचेमध्ये झालेल्या भांडणाच्या रागातुन फिर्यादीची आई व नमुद इसम यांनी मिळुन फिर्यादीचे भाऊ अनिल लालसिंग ठाकुर वय ३० वर्षे रा.सदर यांचे डोक्यात दगड टाकुन त्यास गंभीर जखमी करुन जीवे मारले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.घोरपडे मो.नं.९४०३०४८७६७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३५५/२०२४ भा.न्या.सं.कलम १०९,३(५),आर्म ॲक्ट ४(२५),मपोका कलम ३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३७ वर्षे रा.भवानी पेठ,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०२४ रोजी दु.१५/०० वा.च्या सुमा.चमनशहा चौक काशेवाडी भवानी पेठ पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी चिकन आणणे करीता गेले असता तिथे फिर्यादी यांचे ओळखीचे नमुद इसम यांनी फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी हत्याराने डोक्यात वार करण्याचा प्रयत्न केला असता तो फिर्यादी चुकविल्याने त्यांनी हाताच्या पंज्यावर व अंगठ्याला गंभीर जखम करुन फिर्यादीना जीवे ठार मारण्याच्या प्रयत्न करुन नमुद ठिकाणी दहशत निर्माण केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विटे मो.नं.९९६०९६१०१३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ५३०/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०९(४),३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४० वर्षे रा.सिंहगड कॉलेज रोड आंबेगाव,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/२०२४ रोजी रात्रौ २३/३० वा. दरम्यान भैरोबानाला चौक सोलापुर कडे जाणाऱ्या रोडवर फातिमानगर वानवडी. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी बाहेरगांवी जाणे करीता ट्रॅव्हल्सची वाट पाहत उभे असताना व मोबाईलवर बसची लाईव्ह ट्रॅकींग चेक करत असताना मोटारसायकलवरील नमुद तीन अज्ञात इसम हे फिर्यादीच्या जवळ त्यांचे हातातील ९९,९००/- रु.किं.चा आय फोन चोरुन नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पालवे मो.नं ९५०३९४१५४२ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** लोणीकंद पो स्टे ९५९/२०२४,भा.न्या.सं.क.३१६(२), ३(५)

**फिर्यादी** एक इसम वय ३२ वर्षे, योजनानगरचे पाठीमागे, जेधे पार्क जवळ लोहगाव,पुणे

**आरोपीत** दोन महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०९/१०/२०२४ रोजी सायं.१९/३० वा.पासुन ते २०/०५ वा.चे सुमारास ज्वेलर्स शोरुम वाघोली पुणे

**तपशिल** यातील नमुद दोन महीलांनी फिर्यादी हे नोकरी करीत असलेल्या शोरुममध्ये कांउटरवर जावुन सोन्याचे बांगडया खरेदी करावयाच्या आहे असा बहाणा करुन काऊंटरवर असणारे सेल्समन स्टाफचा व फिर्यादीचा विश्वास संपादन करुन २,६०,०००/- रू,किं.च्या सोन्याचे बांगडयाचा परस्पर अपहार केला.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी.रविंद्र गोडसे मो.नं.८०८२०७७१००

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** मुंढवा पो स्टे ३८७/२०२४,भा.न्या.सं.क ३१८(४),३१९(२)माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(डी)

**फिर्यादी** एक महिला वय ३३ वर्षे,रा.बी.टी.कवडे रोड,पुणे

**आरोपीत** अज्ञात मोबाईल धारक(अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०९/०९/२०२४ रोजी ते दि.१०/०९/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादीस अज्ञात मोबाईल धारक फोनद्वारे संपर्क करून इंदिरा गांधी इंटरनॅशनल एअरपोर्ट,टी-३,टर्मिनल,दिल्ली येथुन कस्टम डिपार्टमेंट मधुन कस्टम ऑफीसर बोलत असुन, फिर्यादीचे आदित्य नावाच्या मित्राला त्यांनी लार्ज अमाऊंट ऑफ फॉरेन करंन्सी चे केसमध्ये पकडले असुन त्याकरिता इंडियन करन्सी कन्व्हर्झन करिता फिर्यादीशी संपर्क केला असल्याचे सांगुन त्यांना दिलेल्या बँक खात्यावर पैसे ट्रान्सफर करणेस सांगुन फिर्यादीची १७,५१,४९९/- रु.ची आर्थिक फसवणुक केली

**त.अंमलदार** वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.जगताप मो.नं.८००७०६६३००

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** भारती विद्यापीठ पो स्टे ८३६/२०२४,भा.न्या.सं.कलम,३१६(५),३१८(४),३१९(२),३(५)माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(डी)

**फिर्यादी** एक इसम वय ४० वर्षे,रा.रामनगरी,आंबेगाव बुा,पुणे

**आरोपीत** अज्ञात मोबाईल धारक(अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि १८/८/२०२४ ते दि १०/९/२०२४ रोजी दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांना नमुद अज्ञात मोबाईल धारक यांनी शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केल्यावर चांगला परतावा मिळतो त्या अनुषंगाने ग्रुप वर मला जॉईन करुन घेवुन एक अप्लीकेशन मोबाईल मध्ये डाऊनलोड करण्यास लावुन त्यांचे वेगवेगळ्या बँक अकाऊंट मध्ये ३७,१०,०००/- रू.रक्कम प्राप्त करुन घेवुन गुंतवणुक केलेल्या पैशाबाबत काही एक परतावा व मुळ रक्कम परत न देता फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली..

**त.अंमलदार** पोलास निरीक्षक (गुन्हे)श्री.शरद झिने मो.नं.८८८८८१३३०१

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोथरूड पो स्टे २९३/२०२४,भा.न्या.सं.क.३१८(४),३१९(२),३(५)माहिती व तंत्रज्ञान का.क . ६६(डी)

**फिर्यादी** एक इसम वय ४५ वर्षे रा.कोथरूड,पुणे.

**आरोपीत** अज्ञात मोबाईल धारक(अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०७/२०२४ ते १९/०९/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादीस नमुद मोबाईल धारक यांनी ग्रुप व वयक्तिक व्हॉट्सअँप द्वारे संपर्क करुन शेअर ट्रेडींग कंपनीचे अधिकृत व्यक्ती असल्याचे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन कंपनीचे शेअर ट्रेडींग अँपच्या माध्यामातुन ट्रेडींग केल्यानंतर चांगला प्रॉफीट मिळेल असे सांगुन कंपनीचे शेअर ट्रेडींग अँप डाऊनलोड करण्यास सांगुन शेअर ट्रेडींग व आय़ पी ओ करीता प्रोत्साहीत करुन विविध बँक खात्यावर फिर्यादी कडुन ९,९९,०००/- रु ट्रान्सफर करुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

**त.अंमलदार** वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.देशमाने मो.नं.८१०८७३४०४०

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सायबर पो स्टे ७९३/२०२४,भा.न्या.सं.क.३१८(४),३१९(२),३(५)माहिती व तंत्रज्ञान का.क . ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २७ वर्षे रा.गणपती मंदिराजवळ मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०८/२०२४ ते दि.०७/१०/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी शेअर ट्रेडिंगमार्फत नफा मिळवून देतो म्हणून फिर्यादीचा विश्वास संपादन करून जास्तीचा नफा मिळवून देण्याचे बहाण्याने फिर्यादीची ७८,२४,९८०/- रू.ची अर्थिक फसवणूक केली. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती स्वप्नाली शिंदे,मो.नं.९९२३७९६५८७ |

**प्रेस नोट दि.११/१०/२०२४**

**<u>दि.११/१०/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ३८८/२०२४,भा,न्या.सं.कलम १०५,२८१,१२५(अ)मो.व्ही.ॲक्ट१३२,११९/१७७,१८४ |
| **फिर्यादी** | अकबर शेख, वय ५१ वर्षे, रा.शिंदे वस्ती हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | एक कार चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१०/२०२४ रोजी रात्रौ ०१/३५ वा.चे सुमा.पुनावाला फिनकॉर्प समोर,एबीसी फॉर्म रोडवर मुंढवा,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी मुलगा रौफ अकबर शेख वय २१ वर्षे रा.शिंदे वस्ती, हडपसर, पुणे यांचे मोपेडला पाठीमागुन जोराची धडक देवुन त्यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.आण्णासाहेब टापरे मो.नं.७०५७०४०५५६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**